उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील ग्रामिण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालयातील दंतचिकित्सा विभागातील अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०१९ /प्र.क्र. १६९/आरोग्य-३
१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: २४ मे,२०१९.

वाचा -

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक-पदआ- २०१८/प्र.क्र.१६४/आरोग्य -३, दिनांक - १९.१०.२०१८.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक-पदआ- २०१८/प्र.क्र.२४७/आरोग्य -३, दिनांक - १९.१०.२०१८.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक-पदआ- २०१८/प्र.क्र.९७/आरोग्य -३, दिनांक - १९.१०.२०१८.
४) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/मौ.आ/अपदे/४०२-०७/४१०-११/४१४--१९/१८,दिनांक-११.०५.२०१८.

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील १)उपजिल्हा रुग्णालय,तिरोडा जि.गोंदिया, २) उपजिल्हा रुग्णालय, साकोली जि.भंडारा, ३) ग्रामिण रुग्णालय, भिडी जि.वर्धा, ४) ग्रामिण रुग्णालय, पुलगांव जि.वर्धा, ५) ग्रामिण रुग्णालय, समुद्रपूर जि.वर्धा, ६) ग्रामिण रुग्णालय, सेलू जि.वर्धा, ७) ग्रामिण रुग्णालय, हिंगणा जि.नागपूर व ८) ग्रामिण रुग्णालय, वडनेर जि.वर्धा येथील दंत शल्य चिकित्सक (१ पद) व दंत सहायक (१ पद) ही प्रत्येकी २ पदे तसेच ९) उपजिल्हा रुग्णालय, वरोरा जि.चंद्रपूर येथील दंतशल्यचिकित्सक (१ पद), दंत यांत्रिकी (१पद), अधिपरिचारीका (१ पद), व सहायक (१पद) या ४ अस्थाई पदास दि.०१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील १)उपजिल्हा रुग्णालय,तिरोडा जि.गोंदिया, २) उपजिल्हा रुग्णालय, साकोली जि.भंडारा, ३) ग्रामिण रुग्णालय, भिडी जि.वर्धा, ४) ग्रामिण रुग्णालय, पुलगांव जि.वर्धा, ५) ग्रामिण रुग्णालय, समुद्रपूर जि.वर्धा, ६) ग्रामिण रुग्णालय, सेलू जि.वर्धा, ७) ग्रामिण रुग्णालय, हिंगणा जि.नागपूर व ८) ग्रामिण रुग्णालय, वडनेर जि.वर्धा येथील दंत शल्य चिकित्सक (१ पद) व दंत सहायक (१ पद) ही प्रत्येकी २ पदे तसेच ९) उपजिल्हा रुग्णालय, वरोरा जि.चंद्रपूर येथील दंतशल्यचिकित्सक (१ पद), दंत यांत्रिकी (१पद), अधिपरिचारीका (१ पद), व सहायक (१पद) या ४ अस्थाई पदास दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१९-२०२० या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक-आर-१</u>

१) २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०३ - ग्रामिण आरोग्य सेवा व विषम चिकित्सा
११०-१ - इतर रुग्णालये व दवाखाने
(०१) (०१) - कुटीर रुग्णालये (२२१० ०३१५)

२) २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - सार्वजनिक आरोग्य
००१ - संचालन व प्रशासन
(०१) (०९) - महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामिण/कुटीर रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन (२२१० ४६२४)

३) २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - सार्वजनिक आरोग्य
००१ - संचालन व प्रशासन
००१ (०८) - प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामिण रुग्णालयाइतका दर्जा वाढविणे . (२२१० ०४१३)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्रमांक,पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दिनांक-२१.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२४१११४५८७३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.05.24 15:43:16 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये-राज्यस्तर) मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नागपूर/गोंदिया/भंडारा/वर्धा/ चंद्रपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/गोंदिया/भंडारा/वर्धा/ चंद्रपूर.
९. वैद्यकीय अधिक्षक, (उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांचेमार्फत).
१०. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य-३)